मजकुर :—

दिनांक ०५/०५/२०२५ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या आदेशाने “ **Best Detection of the Month ”** माहे जानेवारी —२०२५ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

## (अ) १) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ जानेवारी —२०२५

| | | |
|---|---|---|
| ०१ | गु.प्र.शा.गु.अ.वि. कक्ष—७, मुंबई | कांजुरमार्ग पोलीस ठाणे गु.र.क्र. २३/२५, कलम १०३(१) भारतीय न्याय संहिता सन २०२३ |

—: “जीवे ठार मारणे.”:—

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत :—** नमूद नमुद गुन्हयात मयत इसम नामे राजेश मनबिरसिंग सारवान याचा मृतदेह सर्व्हिस रोड, मुंबई—ठाणे पुर्व द्रुतगती महामार्ग, कांजुरमार्ग पुर्व, मुंबई येथील मेट्रो कारशेड च्या बाजुला डबक्यामधील पाण्यात अर्धनग्न उताऱ्या अवस्थेत मिळून आला. मयताच्या डोक्याच्या डाव्या बाजूस कानाच्या वर जबर जखमा दिसून येत होत्या. नमुद इसमास अज्ञात इसमाने कोणत्यातरी अज्ञात कारणावरुन हत्याराने डोक्यात मारुन गंभीर जखमी करुन त्याच्या मरणास कारणीभूत झाला म्हणून गुन्हा नोंद

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री. सुरेश अशोक माळी वय ४१ वर्ष |
| बळीत | :— | राजेश मनबीरसिंग सारवान , वय ४१ वर्षे, |
| आरोपी अटक व दिनांक | :— | १) रोहीत चंडालिया वय २९ वर्ष,<br>२) सागर पिवाळ वय ३० वर्ष,<br>अटक दिनांक — २२/०१/२०२५ |

**तपास कौशल्य :—** दिनांक १९/०१/२०२५ रोजी १७.३० वा. च्या सुमारास मयत इसम नामे राजेश मनबिरसिंग सारवान वय ४१ वर्षे याचा मृतदेह सर्व्हिस रोड, मुंबई—ठाणे पुर्व द्रुतगती महामार्ग, कांजुरमार्ग पुर्व, मुंबई येथील मेट्रो कारशेड च्या बाजुला डबक्यामधील पाण्यात अर्धनग्न उताऱ्या अवस्थेत मिळून आला. मयताच्या डोक्याच्या डाव्या बाजूस कानाच्या वर जबर जखमा दिसून येत होत्या. सदर इसमाचे राजावाडी रुग्णालयात पोस्टमार्टम केले असता, डॉक्टरांनी मरणाचे कारण डोक्याला जबर जखम असे नमुद केले. त्यामुळे नमुद इसमास अज्ञात इसमाने कोणत्यातरी अज्ञात कारणावरुन हत्याराने डोक्यात मारुन गंभीर जखमी करुन त्याच्या मरणास कारणीभूत झाला म्हणून कांजुरमार्ग पोलीस ठाणे येथे दिनांक २०/०१/२०२५ रोजी गु.र.क्र. २३/२५ कलम १०३(१) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

मयत इसमास अज्ञात इसमाने कांजुरमार्ग येथील मुंबई—ठाणे पुर्व द्रुतगती महामार्गाच्या लगत गवतातील पाण्याच्या डबक्यात मारून टाकले होते. आरोपीत इसमाबाबत कोणतीही माहीती नसल्याने तसेच घटनास्थळी कोणतेही सिसिटीव्ही फुटेज उपलब्ध नसल्याने मयत इसमास कोणत्या दिवशी व कोणत्या वेळी आणुन मारले याचा शोध घेवुन गुन्हा उघडकीस आणण्याकरीता मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे), मुंबई यांनी मा.पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण—१) गुन्हे शाखा, मुंबई यांच्या नेतृत्वाखाली गुन्हे शाखेची ०४ पथके तयार करण्यात आली. सदर पथकांकडुन सी.सी.टी.व्ही. फुटेज पाहणे, आरोपीबाबत गोपनीय माहीती प्राप्त करणे, आरोपीचा तांत्रिक तपासाद्वारे शोध घेण्याचे प्रयत्न चालु झाले.

मयत इसमाची बॉडी पुर्व द्रुतगती महामार्गाच्या कडेला अर्धनग्न अवस्थेत मिळुन आल्याने, त्याच्यावर काही अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न करून त्याचा खुन झाला आहे याबाबतची शक्यता पडताळण्याकरीता द्रुतगती महामार्गालगत भिक मागणारे तृतीयपंथी व्यक्तींची गुन्हयाच्या तपासात चौकशी केली परंतु उपयुक्त माहीती मिळुन आली नाही.

त्यानंतर पोलीस पथकांकडुन बळीत मयताचा मृतदेह मिळुन आलेल्या कांजुरमार्ग परिसरापासुन ते मयत इसम राहत असलेले वाल्मीक रहिवासी संघ, चकाला रोड, अंधेरी पुर्व पर्यंतचे १३ किलोमिटर पर्यंतचे २२५ ते २५० सी.सी.सी.टी कॅमेरे तपासले. त्यापैकी एका सीसीटीव्ही कॅमेरामध्ये मयत इसम हा गुन्हा दाखल होण्यापुर्वी दोन दिवस आगोदर ४ ते ५ अनोळखी इसमांसोबत अंधेरी परिसरातील एका ठिकाणी बोलत असल्याचे दिसुन आला. त्या अनोळखी इसमांबाबत माहीती घेण्याचा प्रयत्न केला, परंतु उपयुक्त माहीती मिळुन आली नाही. त्यानंतर मयत इसम कोठे—कोठे जातो याचा सी.सी.टी.व्ही. फुटेजव्दारे शोध घेत असताना, मयत इसम एका गल्लीत ०२ अनोळखी इसमांसोबत चालत जावुन पुढे एका ॲटोरिक्षात बसताना दिसला. सदर रिक्षाचा नंबर मिळविण्याचा प्रयत्न केला परंतु रात्रीची वेळ असल्याने रिक्षाचा नंबर लाईटच्या प्रकाशामुळे दिसुन आला नाही. त्यावेळी रिक्षाचे बारकाईने निरीक्षण केले असता, रिक्षाच्या पाठीमागील बाजुस कोप—यात विशिष्ठ आकाराचे रेडियम चमकताना दिसले. सदर रेडीयमवरून रिक्षाचा मागोवा घेतला असता सदरची रिक्षा घाटकोपर मार्गे पुर्व द्रुतगती मार्गावर असलेल्या घटनास्थळाकडे जाताना दिसली. त्यामुळे मयत इसम त्याच्या वाल्मीक नगर, चकाला रोड, मुंबई येथील राहते घरापासुन ज्या मार्गाने कांजुरमार्ग परिसरात त्या दोन अनोळखी इसमांसोबत गेला, त्या संपुर्ण मार्गाचा मोबाईल डम्प डेटा काढुन त्याचे परिक्षण केले परंतु मयत इसम मोबाईल फोन वापरत नसल्याने त्याचा मोबाईल फोन तसेच संशयीत इसमांचे मोबाईल क्रमांक निष्पन्न झाले नाही. त्यानंतर मयत इसमासोबत रिक्षात बसलेल्या त्या दोन अनोळखी इसमांवर संशय आल्याने त्या इसमांचे सीसीटीव्ही फुटेजमधील फोटो अंधेरी परिसरातील लोकांना दाखवुन त्यांची ओळख पटविण्याचा प्रयत्न केला असता, सदरचे इसम रेकॉर्डवरील आरोपी नामे रोहीत चंडालिया वय २९ वर्ष व सागर पिवाळ वय ३० वर्ष दोघे रा.ठी. विलेपार्ल, मुंबई असल्याची माहीती प्राप्त झाली.

सदर संशयीत इसमांचे मोबाईल क्रमांक गोपनीय खबरीकडुन प्राप्त करून त्यांचे प्राप्त सीडीआर चे विश्लेषण करून त्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. सदर प्राप्त सी.डी.आर.चे बारकाईने अवलोकन केले असता, सदरचे संशयीत हे ज्यावेळी रिक्षात बसुन बळीत इसमासोबत कांजुरमार्ग परिसराकडे गेले, त्यावेळी त्यांच्या मोबाईलचे लोकेशन हे त्यांच्यासोबत कांजुरमार्ग परिसरात न येता अंधेरी, मुंबई परिसरात मिळुन आले. त्यामुळे त्यांच्यावरील संशय बळावल्याने त्यांना विलेपार्ले, मुंबई परिसरातुन ताब्यात घेवुन त्यांच्याकडे कौशल्यपुर्ण तपास केला असता, त्यांनी मयताचा सावत्र भाऊ राकेश सारवान याने प्रॉपटीच्या वादातुन मारण्याची सुपारी दिल्याने मयत इसमाशी असलेल्या पुर्वीच्या ओळखीतुन त्यास फसवुन कांजुरमार्ग येथील निर्जन गवताळ ठिकाणी नेले. त्याठिकाणी मयत इसमास दारू पाजुन तो दारूच्या नशेत असताना त्याच्या डोक्यात दगड आपटुन त्यास जिवे ठार मारल्याचे सांगितले.

सदर दोन्ही आरोपीतांची वैदयकीय तपासणी राजावाडी रूग्णालय, घाटकोपर, मुंबई येथे करण्यात आली व त्यांना पुढील कारवाईकरीता कांजुरमार्ग पोलीस ठाणेच्या ताब्यात देण्यात आले.
तरी गुन्हे शाखेतील अधिकारी व अंमलदार यांनी मा. वरि ठांचे मार्गदर्शनानुसार अनोळखी इसमास निर्जन गवताळ ठिकाणी दगडाने ठेसुन ठार मारून पळुन गेलेल्या गंभीर गुन्हयातील दोन अज्ञात आरोपीतांना तांत्रीक तपास व गोपनीय माहीतीवरून निष्पन्न करून आरोपींचा ठाव ठिकाणा शोधुन त्यांना ताब्यात घेवुन त्यांच्याकडे कौशल्यापुर्वक तपास करून सदरचा गुन्हा उघडकीस आणला.

गु.प्र.शा.गु.अ.वि.कक्ष—७, मुंबई तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार

| अ. क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | पोलीस निरीक्षक | श्री. आत्माजी शिवाजी सावंत (गुन्हे शाखा,कक्ष ७) | प्रशस्तीपत्रक |
| २ | पोलीस निरीक्षक | श्री. दिपक अनंत सावंत (गुन्हे शाखा,कक्ष १०) | प्रशस्तीपत्रक |
| ३ | पोलीस निरीक्षक | श्री. लक्ष्मीकांत नारायण साळुंखे (गुन्हे शा.कक्ष ८) | प्रशस्तीपत्रक |
| ४ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | श्रीमती वैशाली विजय सरवदे(गुन्हे शाखा,कक्ष ७) | प्रशस्तीपत्रक |
| ५ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | श्री.धनाजी आत्माराम साठे (गुन्हे शाखा,कक्ष ७) | प्रशस्तीपत्रक |
| ६ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | श्री. मधुकर दत्ता धुतराज (गुन्हे शा.कक्ष ८) | प्रशस्तीपत्रक |
| ७ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | श्री. संग्राम नारायण पाटील (गुन्हे शा.कक्ष ८) | प्रशस्तीपत्रक |
| ८ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | श्री.सचिन गोविंद गावडे (गुन्हे शा.कक्ष ६) | प्रशस्तीपत्रक |
| ९ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | श्री. उत्कर्ष अशोक वझे(गुन्हे शा.कक्ष ९) | प्रशस्तीपत्रक |
| १० | पोलीस उप निरीक्षक | श्री. स्वप्निल रामदास काळे (गुन्हे शा.,कक्ष ७) | प्रशस्तीपत्रक |
| ११ | पोलीस उप निरीक्षक | श्री. महेश भगवान शेलार (गुन्हे शा.,कक्ष ७) | प्रशस्तीपत्रक |
| १२ | पोलीस उप निरीक्षक | श्री. नामदेव विठोबा परबळकर (कक्ष ७) | प्रशस्तीपत्रक |
| १३ | पोलीस उप निरीक्षक | श्री. विकास सुभाष मोरे (कक्ष ८) | प्रशस्तीपत्रक |
| १४ | स.फौ.क्र.३०७१७ | अरूण अनंत सावंत ( कक्ष ७) | प्रशस्तीपत्रक |
| १५ | स.फौ.क्र.३०४०७ | नितीन बाबुलाल शिरसाट ( कक्ष ८) | प्रशस्तीपत्रक |
| १६ | पो.ह.क्र.३१३४७ | दिपक पुरूषोत्तम पवार | प्रशस्तीपत्रक |
| १७ | पो.ह.क्र.३२८०७ | संतोष बाबी गुरव | प्रशस्तीपत्रक |
| १८ | पो.ह.क्र. ३४१७७ | राजेंद्र भिमाजी शिंदे | प्रशस्तीपत्रक |
| १९ | पो.ह.क्र.९६०५५२ | शशिकांत कष्णा कांबळे | प्रशस्तीपत्रक |
| २० | पो.ह.क्र.९६०६३३ | अजय शंकर बल्लाळ | प्रशस्तीपत्रक |
| २१ | पो.ह.क्र.९७०९४४ | अस्लम महम्मद शेख | प्रशस्तीपत्रक |
| २२ | पो.ह.क्र.००३५१ | विनोद अंबादास शिरापुरी | प्रशस्तीपत्रक |
| २३ | पो.ह.क्र. ०३८३५ | प्रमोद सोमनाथ जाधव | प्रशस्तीपत्रक |
| २४ | पो.ह.क्र. ०६१९४० | विलास नामदेव राऊत | प्रशस्तीपत्रक |
| २५ | पो.शि.क्र. ०८०५०० | लुकमान जुल्फोद्दिन सय्यद | प्रशस्तीपत्रक |
| २६ | पो.शि.क्र. ०८०८७२ | विकास आबा होनमाने | प्रशस्तीपत्रक |
| २७ | पो.शि.क्र. ०९०४६४ | महेश वसंत सावंत | प्रशस्तीपत्रक |
| २८ | पो.शि.क्र. १५०४९८ | हर्षल बोडखे | प्रशस्तीपत्रक |
| २९ | पो.शि.क्र. ०९०५७२ | जितेंद्र चंद्रकांत पाटील | प्रशस्तीपत्रक |
| ३० | म.पो.शि.क्र.११२१५३ | हिना फहाद शेख | प्रशस्तीपत्रक |
| ३१ | पो.ह.चा.क्र. ००६८८ | राजाराम कदम | प्रशस्तीपत्रक |
| ३२ | पो.ह.क्र. ९६०४८८ | दिनेश मनोहर चव्हाण ( कक्ष ८) | प्रशस्तीपत्रक |

| | | | |
|---|---|---|---|
| ३३ | पो.ह.क्र. ९६१२४८ | महेद्र पन्नालालल यादव ( कक्ष ८) | प्रशस्तीपत्रक |
| ३४ | पो.ह.क्र. ००१०९ | मंगेश राजाराम किणी( कक्ष ८) | प्रशस्तीपत्रक |
| ३५ | पो.ह.क्र. ०३५७४ | सचिन दिलीप काकडे( कक्ष ८) | प्रशस्तीपत्रक |
| ३६ | पो.ह.क्र. ०३६०५ | संजय ंकर कुरकुटे( कक्ष ८) | प्रशस्तीपत्रक |
| ३७ | पो.ह.क्र. ०४०५४३ | विश्वास राजाराम सावंत ( कक्ष ८) | प्रशस्तीपत्रक |
| ३८ | पो.शि.क्र.०८०९७१ | सचिन रघुनाथ राहेरे ( कक्ष ८) | प्रशस्तीपत्रक |
| ३९ | पो.शि.क्र.०९१५६३ | योगेश शिवाजी सटाले ( कक्ष ८) | प्रशस्तीपत्रक |
| ४० | पो.शि.क्र.०९२९४० | शरद लक्ष्मण बिडवे( कक्ष ८) | प्रशस्तीपत्रक |
| ४१ | पो.ह.क्र.०३६५६ | अमित आत्माराम जगताप (कक्ष १०) | प्रशस्तीपत्रक |

| | | |
|---|---|---|
| ०२ | **वनराई पोलीस ठाणे, परिमंडळ—१२ मुंबई** | **२७/२०२५कलम ६४ (२)(एम) भारतीय न्याय संहिता** |

**—: जबरदस्तीने लैगिग अत्याचार करणे :—**

<u>गुन्हयाची थोडक्यात हकिकत</u> :—फिर्यादी हया स्टेशन कडे जात असताना रिक्षावाल्याने तिला रिक्षामध्ये बसवून स्टेशन ला सोडतो असे सांगून तिच्याशी जवळीक वाढवून फिर्यादीला परत वसईला चल तुला समुद्र दाखवतो असे सांगून त्याठिकाणी नेवून तिच्यावर जबरदस्तीने लैगिंग अत्याचार केला असे फिर्यादी यांनी सांगितल्याने त्यांचा जबाब नोंद करून वनराई पोलिस ठाणेस गुन्हा नोंद करण्यात आला

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | कु संध्या उर्फ दिक्षिता श्यामप्यारे यादव वय २० वर्षे |
| बळीत | :— | कु संध्या उर्फ दिक्षिता श्यामप्यारे यादव वय २० वर्षे |
| आरोपी अटक व दिनांक | :— | राजरतन सदाशिव वायवळ,वय ३२ वर्षे<br>दि.२४/०१/२०२५ |

<u>तपास कौशल्य :—</u> फिर्यादी हे वरील प्रमाणे असून वर नमूद पत्यावर तिचे वडील श्यामप्यारे यादव व आई सुशीला देवी, लहान बहीण नामे खुशी यादव व लहान भाउ सौरव यादव यांचेसोबत रहावयास आहे. तसेच फिर्यादीचे वडील हे इडलीचा व्यवसाय करित असून फियादी हे तिच्या आईसोबत घराजवळील असलेल्या डीश कंपनीत काम करतात. फिर्यादी ही कधीही शाळेत गेली नाही त्यामुळे तिला लिहीता वाचता येत नाही. तसेच तिचे वडील तिला नेहमी ओरडतात व मारतात आणि तिचे बहिण भाउ ही तिच्यासोबत वाद घालतात. फिर्यादीला तिचे आई वडील हे प्रेम करित नाहीत.

दिनांक २१/०१/२०२५ रोजी फिर्यादीला तिच्या वडीलांनी तिला कॉफी बनवयाला सांगितली त्यावेळी फिर्यादीने वडीलांना सकाळी ०९.०० वाजता त्यांना कामावर जायचे असल्याने सांगून त्यांना कॉफी देण्यास नकार दिला त्यावेळी तिला तिच्या वडीलांनी बेल्टने मारहाण केली. त्यानंतर फिर्यादी हया कंपनी मध्ये रडत रडत कामाला गेली व तिच्या आईला देखिल वडीलांनी मारले तेव्हा तिच्या आईच्या डोक्याला टाके पडले होते त्यामुळे ती कामाला गेली नव्हती. फिर्यादीला वडीलांचा राग आल्याने फिर्यादी यांनी कंपनीचे मालक यांचेकडुन ३०००/— रूपये कामाचे पैसे घेतले व रिक्षा पकडून सायंकाळी ०५.०० वाजता गोराई नाका येथे गेली तेथून वालीव पोलिस ठाणेस वडीलांच्या विरोधात तक्रार दाखल करण्यास गेली तेव्हा तिथे तिने महिला पोलिस यांना तिचे आई वडील मारतात व शिवीगाळ व वाद घालतात असे बोलून तिच्या आई वडील यांचे विरोधात तक्रार दयायची आहे असे सांगितले. त्यावर तेथील पोलीसांनी फिर्यादी यांना वडीलांनी परत वाद घातला तर तक्रार करण्यास पोलीस ठाणेस या असे बोलले असता फिर्यादी हे तेथून निघुन रिक्षा मध्ये बसून नालासोपारा रेल्वे स्टेषन येथे गेल्या. तेथे रिक्षावाल्याला तिने तिचे आई वडील त्रास देतात व त्याची कंप्लेट केली आहे असे सांगितले तेव्हा त्याने तिला कुठे जायचे आहे असे विचारले तेव्हा फिर्यादीनी रिक्षावाल्यास जीव दयायचा आहे, आत्महत्या करायची आहे असे सांगितले तेव्हा त्याने तीला जीव देवू नको, माझेसोबत वसईला चल तुला समुद्र दाखवतो असे बोलून ते दोघे नालासोपारा रेल्वे स्टेशन येथून वसई येथे ट्रेनने गेले व तेथून रिक्षा करून जवळच असलेल्या बिचला गेले तेव्हा तिने त्यास २००/— रूपये दिले त्यावेळी रात्रीचे ०९.०० वाजले होते तेव्हा त्याने तिला तिचे आयडी मागून हॉटेल मध्ये रूम बुक करू असे सांगितले तेव्हा तिने त्यास आयडी नाही असे सांगितले तेव्हा त्याने वसई रेल्वे स्टेशन येथे उतरल्यानंतर २ बॉटल बिअर घेतल्या त्यानंतर त्याने तिला बिचवर घेवून गेला व तेथे

माती मध्ये बसून रिक्षावाल्याने फिर्यादीशी आई वडीलाबद्दल विचारले त्यानंतर त्याने तिला लग्नाबाबत विचारले तेव्हा फिर्यादीने त्याला ती २० वर्षाची असून तिला आता लग्न करायचे नाही असे सांगितले त्यानंतर तो २ बॉटल बिअर पिला व तिला पण पी असे बोलत होता पण तिने नकार दिला. त्यानंतर त्याने तिथे असलेल्या हॉटेलवाल्याला रूम बाबत विचारले तीच्याकडे आयडी नसल्याने त्याने नकार दिला. त्यानंतर बिअर पिल्यानंतर रिक्षावाल्याने तिच्यासोबत जबरदस्ती करू लागला व त्याने तिचे कपडे काढले आणि तिला त्याचे लिंग तिला तोंडात घेण्यास सांगितले आणि तिच्या सोबत जबरदस्ती केली त्यानंतर त्याने ओठाला, छातीला मुके घेवून चावत होता व त्याचे नखे तिच्या गळयावर व हातावर लागले त्यानंतर प्लास्टीक सारखे काहीतरी त्याच्या लघवीच्या जागेवर लावले आणि तिच्या लघवीच्या जागेवर त्याने त्याचे लिंग तिच्या लघवीच्या जागेत आत घातले व आत बाहेर करू लागला. त्यावेळी ती ओरडत होती त्यावेळी तेथे कोणीच नव्हते त्याने सांगितले की, पाणी आत नाही टाकत वाहेर काढेन असे बोलून त्याने तिच्यासोबत दोन वेळा जबरदस्तीने रेप केला. रात्री ०३.०० वाजेपर्यत तो तिच्यासोबत ते करत होता त्यानंतर त्याने तिला कपडे घालायला लावले व त्याने ०४.०० वाजता त्याने तिला रिक्षाने वसई स्टेशन येथे घेवून गेला तिथे तिला वॉशरूमला जायचे होते तेव्हा त्याने तिला लेडीज वॉशरूम बाहेर सोडले त्यावेळी ती वॉशरूम मधून बाहेर आल्यानंतर रिक्षावाला तेथे दिसला नाही तो तेथून पळून गेला होता त्यांनतर ती खूप घाबरली.

दिनांक २२/०१/२०२५ रोजी सकाळी ०५.०० वाजता नालासोपारा येथे ती ट्रेनने गेली त्यांनतर ती पूर्ण दिवस स्टेशनच्या बाहेर होती व त्यावेळेस तीच्या पोटात दुखत होते आणि तिला उलटया पण झाल्या. त्यांनतर ती रात्री १२.०० वाजता नालासोपारा ते गोरेगाव ट्रेन मध्ये बसली व गोरेगांव स्टेशन येथे रात्री एक वाजता पोहचली. गोरेगांव स्टेशन येथे उतरल्यानंतर स्टेशन वर तीने लहान छोटे दगड आणि नालासोपारा येथे तीने पानटपरी येथून ब्लेड घेतले होते ते तीन लघवीच्या जागेत तीने स्वत:हून दोन लहान छोटे दगड आणि ब्लेड आत टाकले कारण तीला भिती वाटत होती की तिचे आई वडीलला तिच्या सोबत जे रिक्षावाल्याने केल ते कळेल आणि ते मला मारतील. तेव्हा तेथे तिला एक इसम दिसला त्याला तिने तिचेसोबत जे काही घडले ते सांगितले तेव्हा त्यांनी पोलिसांना कॉल केला त्यानंतर तेथे पोलिस आले व त्यांनी पोलिस स्टेशनला घेवून गेले. तिच्या लघवीच्या जागेत दुखत होते तसेच तिचे पोटात दुखत होते. तेव्हा तिला पोलिसांनी हॉस्पीटल येथे घेवून गेले तेथे उपचार केल्यानंतर दुस—या मोठे हॉस्पीटल मध्ये ॲडमिट केले. तेथे तिच्यावर उपचार चालू आहेत.त्यांनतर डॉक्टरांनी तिच्या लघवीच्या जागेत तिने स्वत:हून टाकलेले दोन दगड व ब्लेड काढून दिले.

तिला नालासोपारा येथून वसई येथे घेवून जावून तिच्यासोबत जबरदस्तीने सेक्स करून तिच्यावर लैगिंग अत्याचार केलेल्या रिक्षा चालक यास तिने बघीतल्यावर ती ओळखेन आणि त्याने त्यावेळी पांढरा शर्ट, पांढरी पॅट घातली होते व त्याच्या गालावर चाकू लागल्याचे कट असलेले निशाणी आहे व त्याच्या पोटावर मोठे जखमा आहेत. त्याने तिच्यावर रेप केला अशी तक्रार आहे. पहिल्यांदा तिने पोलिसांना भिती वाटत असल्याने त्यावेळी खोटे बोलले होते.तिने वरील दिलेला जबाब तिला हिंदीतून वाचून समजावून सांगितला तो तिच्या सांगणे वरून बरोबर लिहीला आहे. तिला तिच्या घरी सर्व जण संध्या नावाने हाक मारतात. अशा आशयाचा जबाब समुपदेषक जोत्सना फुलझेले, वनस्टॉप सेंटर सखी, के.ई.एम हॉस्पीटल यांच्या उपस्थितीत महिला सहा.पोलिस निरीक्षक एम.बी.जोगन यांनी नोदवला असून त्या सविस्तर जबाब दिल्यावरून वनराई पोलिस ठाणेस गु.र.क्र २७/२०२५ कलम ६४(२)(एम) भारतीय न्याय संहिता अन्वये दाखल केला आहे.

सदर गुन्ह्याचा तपास— पोलिस उपायुक्त मा. स्मिता पाटील मॅडम, परिमंडळ १२ व मा. पोलिस उपायुक्त मा.भोईटे सर परिमंडळ ११ यांनी दिलेल्या सुचनेनुसार वरि ठ पोलिस निरीक्षक मा.राजू माने यांनी सदर मुलीच्या पालकाचा तपास व आरोपीचा शोध घेणेकामी वेगवेगळे पथके तयार करण्यात आली.

सदर गुन्हयातील फिर्यादी हिचे ट्रामा केअर हॉस्पीटल, जोगेश्वरी पूर्व मुंबई येथे वैदयकीय तपासणी केल्यानंतर तेथील वैदयकीय अधिकारी यांनी बळीत मुलीचे रासायनिक विष्लेशणा करणेकरिता काही नमूने काढण्यात आले. सदर नमूने हे सिल बंद पॅक व लेबल लावून देण्यात आले आहे. तसेच वैदयकीय अधिकारी ,ट्रामा केअर हॉस्पीटल, जोगेश्वरी प मुंबई यांनी दिलेले असून तसेच त्याच्यासोबत त्यांनी रसायनिक विष्लेषणा करिता पाठविण्यात आलेले पत्र दिले. तसेच तिची वैदयकीय तपासणी केल्याची कागदपत्रे देण्यात आली.

तसेच वैदयकीय अधिकारी, ट्रामा केअर हॉस्पीटल, जोगेश्वरी प मुंबई यांनी फिर्यादी यांची प्रायव्हेट पार्ट यामध्ये ब्लेड सारखे काहीतरी असल्याचे सांगून अजून काही वस्तू असल्याचे सांगून ते

येथे काढू शकणार नाहीत जर काढताना अडथळे आलेनंतर पुढील उपचार करण्याकरिता असणा—या सुविधा ट्रामा हॉस्पीटल येथे नाहीत असे सांगितले त्यानंतर वैदयकीय अधिकारी, ट्रामा केअर हॉस्पीटल, जोगेश्वरी (प) मुंबई यांनी फिर्यादी महिलेस पुढिल उपाचारकामी केईएम हॉस्पीटल, मुंबई येथे पाठविण्यात आले.

तसेच बळीत मुलीस उपचारकामी केईएम हॉस्पीटल, मुंबई येथे आणले असता तेथील वैदयकीय अधिकारी, केईएम हॉस्पीटल, मुंबई यांनी फिर्यादी यांना दाखल करून घेतले तसेच तेथे तिचे उपचार सुरू करण्यात आले. त्यानंतर तेथिल वैदयकीय अधिकारी यांनी फिर्यादीच्या प्राईव्हेट पार्ट मधून ब्लेड व दोन लहान दगड काढले व त्यानंतर फिर्यादी यांना बरे वाटत असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. त्यानंतर फिर्यादीचा जबाब नोंद करण्यात आला. तेव्हा तिने तिच्या जबाबमध्ये तिचे खरे नांव संध्या श्यामप्यारे यादव वय २० वर्षे असे सांगितले.

सदर गुन्हयातील फिर्यादी हिचे केईएम हॉस्पीटल, मुंबई येथे वैदयकीय तपासणी केल्यानंतर तेथील वैदयकीय अधिकारी यांनी बळीत मुलीचे रसायनिक विष्लेशण करणेकरिता काही नमूने काढले.

सदर गुन्ह्याच्या तपासाच्या अनुषंगाने परिमंडळ १२ मधिल वेगवेगळी पथके तयार करण्यात आली. तपासादरम्यान घटनास्थळाचे सीसीटीव्ही फुटेज पाहिले असता बळीत मुलगी ज्या ट्रेनने गोरेगाव स्थानक याठिकाणी उतरली असे विरार ते चर्चगेट चे सी.सी.टी.व्ही फुटेज चेक केले तसेच वेगगेगळी पथके तयार केली. सदर तपासाच्या दृष्टीने सपोनी प्रथमेश विचारे, पोउपनि इंद्रजित भिसे व पोउनि रंजित वणवे यांनी विरार रेल्वे स्टेशन येथे सीसीटीव्ह फुटेजची पाहणी केली असता तेव्हा त्यांना सदर मुलगी ही वसई रेल्वे स्टेशन येथे एका अनोळखी इसमासोबत दिसून आली.त्यावेळी वसई पश्चिम स्थानका बाहेर दुकानाच्या सीसीटीव्ही कॅमेरा मध्ये सदर बळीत मुलगी व सदर अनोळखी इसम हे दोघे एका दुकानाच्या कॅमेरामध्ये दिसून आल्याने तो धागा पकडून आरोपीचा वसई परिसरात शोध चालू करण्यात आला असता साधारणपणे प्राईव्हट ४० कॅमेरांची पडताळणी केल्यानंतर आरोपी इसम हा बळीत मुलीसोबत एका स्वीटमार्ट दुकानाच्या बाहेर नाष्टा करताना दिसून आल्याने सदर दुकानातील सीसीटीव्हीचे बारकाईने निरीक्षण केले असता त्याचे खाण्याचे पेमेंट हे ऑनलाईन स्वरूपात क्यू आर स्कॅन केल्याचे समजून आल्याने तात्काळ पेमेंट व्यवहारबाबतची माहिती दुकानदाराकडून प्राप्त करून लागलीच पेटीएम नोडल यांच्याशी संपर्क करुन सदर आरोपीताचा मोबाईल नंबर प्राप्त केला आणि तात्रिकं विश्लेषणाद्वारे तसेच माहीतगार इसमाच्या मदतीने आरोपी नामे राजरतन सदाशिव वायवळ, वय—३२ वर्षे, धंदा— रिक्षाचालक, रा.ठी— खैरपाडा ,वालीव यास ताब्यात घेण्यात आले. तसेच तपासादरम्यान नमुद गुन्ह्याचे घटणास्थळ कंळब बिच अर्नाळा येथे असल्याने सदरचा गुन्हा हा तसेच पाहिजे आरोपी राजरतन सदाशिव वायवळ, वय—३२ वर्षे व तसेच बळीत मुलीचे वैदयकीय अधिकारी यांनी रसायनिक विश्लेषण करिता काढण्यात आलेले नमूने हे अर्नाळा पोलीस ठाणे, मीरा भाईंदर वसई विरार आयुक्तालय येथे पुढीलतपासकामी वर्ग करण्यात आले. तसेच सदर अर्नाळा पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्र १०/२०२५ कलम ६४(२),(एम) भारतीय न्याय संहिता अन्वये नोंद करण्यात आला आहे

## वनराई पोलीस ठाणे तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक | श्री. राजु किसनराव माने | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | पोलीस निरीक्षक | श्री. सुभाषचंद्र दौलत पोस्टुरे | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | श्री. प्रथमेश प्रकाश विचारे | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | पोलीस उप निरीक्षक | श्री.राहुल देविदास देवडे | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | पोलीस उप निरीक्षक | श्री. इंद्रजीत आनंदराव भिसे | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | स.फौ.क्र.३१६२० | रमेश विलासराव चव्हाण | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | पो.ह.क्र.००.३५० | प्रकाश वसंत पालवे | प्रशस्तीपत्रक |
| ०८ | पो.ह.क्र.३३५६९ | प्रकाश भिकाजी मिसाळ | प्रशस्तीपत्रक |
| ०९ | पो.शि.क्र.०९.२६१२ | आनंद सुर्यभान पाटील | प्रशस्तीपत्रक |
| १० | पो.शि.क्र.०८.१७१७ | दत्तात्रय रामराव मोरे | प्रशस्तीपत्रक |
| ११ | पो.ह..क्र.१८०८० | सागर सुरेश पवार | प्रशस्तीपत्रक |

मजकुर :—

दिनांक ०८/०५/२०२४ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या '' **BEST CONVICTION OF THE MONTH "** माहे जानेवारी—२०२५ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

## (ब) बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ जानेवारी — २०२५

| | | |
|---|---|---|
| ०१ | पवई पोलीस ठाणे, परिमंडळ—१०, मुंबई | गु.र.क्र २१९/२०१८ कलम ३०२,४५२,५०४ भा.दं.वि.सं. (अपमृत्यू नोंद क्र. ४५/१८ कलम १७४ फौ.प्र.संहिता |

—: ''राग मनात धरुन धारदार शस्त्राने जिवे ठार मारणे.'':—

गुन्हयाची थोडक्यात हकिकत :— नमुद गुन्हयात आरोपीताने मयत महिला नामे रईसा त्यांच्यात दोन तीन वर्षापासुन सुरू असलेल्या चाळीतील खोलीच्या मालकी हक्कावरून असलेल्या वादाचा राग मनात धरून तिच्या गळयावर चाकुने वार करून मारल्याचे जीवे मारले म्हणून गुन्हा नोंद

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री.अमजद मोहम्मद शेख, वय ३६ वर्षे, |
| बळीत | :— | श्रीमती रईसा करीम शेख, वय ४५ वर्षे, |
| निकाल दिनांक | :— | दि. २८/०१/२०२५ रोजी |
| अटक आरोपी व अटक दिनांक | :— | १) तौसिफ हशमत शेख, वय २८ वर्षे<br>आरोपी अटक दिनांक २३/०४/२०१८ रोजी |
| दोषसिध्दीचा तपशील | :— | मा. न्यायालयाने मा. न्यायालयाने कलम ३०२ भादवी अन्वये आरोपीतास आजिवन कारावास व ३००००/— रू. द्रव्य दंड अशी शिक्षा सुनावली आहे. आाणी कलम ४५२ भादवी अन्वये ७ वर्षे कारावास व १००००/—रू. द्रव्य दंड अशी शिक्षा सुनावली आहे. .. |

तपास कौशल्य :— नमुद गुन्हयात तपासी अधिकारी यांनी योग्यप्रकारे तपास करुन गुन्हयाच्या तपासात त्रुटी ठेवल्या नाहीत. तसेच यातील मार्गदर्शक अधिकारी यांनी नमुद गुन्हयाच्या सुनावणी च्या वेळी योग्य मार्गदर्शन केले. व न्यायालयीन कोर्ट कामकाज पाहणारे अधिकारी व अंमलदार यांनी फिर्यादी व साक्षिदार यांना योग्य मार्गदर्शन करुन साक्ष देण्याकरीता वेळेत मा. न्यायालयात उपस्थित ठेवून मा. न्यायालयासमक्ष साक्ष देणे कामी हजर केले. व समन्स वॉरन्ट अंमलदार यांनी यातील साक्षिदार व पंच तसेच वैदयकिय अधिकारी यांना वेळेत मा. न्यायालयात हजर राहण्याबातचे पत्र, समंस बजावणी करून हजर ठेवले. तसेच पोलीस निरीक्षक

**पवई पोलीस ठाणे, मुंबई तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नाव**

| अ. क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक | श्री. जितेंद्र सिताराम सोनवणे | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | पोलीस निरीक्षक | श्री.गणेश सुधाकर पाटील | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | पोलीस निरीक्षक | श्री.जयदीप कृष्णा गोसावी | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | पोलीस निरीक्षक | श्री. मोहनसिंग महादेवसिंग रजपुत ( सन २०२० ला सेवानिवृत्त ) | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | पोलीस उप निरीक्षक | श्री. दिपक बालाजीराव रायवाडे | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | श्रेणी पोलीस उप निरीक्षक | श्री. मिलींद सदानंद राणे, | प्रशस्तीपत्रक |

| | | | |
|---|---|---|---|
| ०७ | स.फौ.क्र.३१९७४ | अजय जनार्दन पवार | प्रशस्तीपत्रक |
| ०८ | स.फौ.क्र.३०९९१ | लक्ष्मण दत्तात्रय अडागळे | प्रशस्तीपत्रक |
| ०९ | पो.ह.क्र.०३.५६८ | प्रशांत अरविंद बोढारे | प्रशस्तीपत्रक |
| १० | म.पो.शि.क्र.०८.१२४७ | मनिषा हरीभाऊ थोरात | प्रशस्तीपत्रक |
| ११ | म.पो.शि.क्र. ११.२६२९ | सविता सुदिप पिसाळ | प्रशस्तीपत्रक |
| १२ | म.पो.शि.क्र. १३.०६०८ | .सुवर्णा दिपक येवले | प्रशस्तीपत्रक |

| | | |
|---|---|---|
| ०२ | अंमली पदार्थ विरोधी कक्ष, वरळी युनिट, गु.शा.,गु.अ.वि., मुंबई | गु.र.क्र १३६/२०२२ कलम ८ (क) सह २२(क) एन. डी. पी. एस. अॅक्ट – १९८५ |

—: ''अंमली पदार्थ विक्री व वाहतुकीकरीता बेकायदेशीररित्या बाळगणे '':—

गुन्हयाची थोडक्यात हकिकत :— नमुद गुन्हयात आरोपी याने ११५ ग्रॅम 'एम.डी' (मेफेड्रॉन) हा अंमली पदार्थ (किंमत अंदाजे रुपये १७,२५,०००/—) स्वत:च्या कब्जात विक्री व वाहतुकीकरीता बेकायदेशीररित्या बाळगला म्हणून त्याचेविरूध्द पो.ह.क्र. ९७०६४९/सुधिर साळुंके यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरून अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री. सुधिर सहदेव साळुंके, वय ४४ वर्षे, |
| निकाल दिनांक | :— | दि. ३१/०१/२०२५रोजी |
| अटक आरोपी व अटक दिनांक | :— | १) अहमद अली महम्मद हुसैन शेख उर्फ कडीया, वय ६२ वर्षे आरोपी अटक दिनांक १४/०६/२०२२ रोजी |
| दोषसिध्दीचा तपशील | :— | मा. न्यायालयाने अटक आरोपीस १० वर्षे सश्रम कारावास व रूपये १,००,०००/— दंड, दंड न भरल्यास १ वर्ष सश्रम कारावास ही शिक्षा सुनावली आहे |

तपास कौशल्य :— दिनांक १३/०६/२०२२ रोजी पो.नि. काळे, स.पो.नि.साळुंखे व पोलीस पथक कक्ष कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात गस्त करीत असतांना त्यांना गस्ती दरम्यान कनाकिया मियामी टॉवर व मोहिनी मेन्शन या दोन बिल्डींगच्या मधिल जनाबाई चाळीकडे जाणारी गल्ली, मोरी रोड, माहिम (प.), मुंबई—१६ या ठिकाणी एका इसमाच्या हालचाली संशयास्पद दिसून आल्याने पो.नि. काळे, स.पो.नि.साळुंखे व पथक यांनी त्यास जागीच अटकाव केला. त्यानंतर पो.ह.क्र. ९६११६७/चव्हाण याचे मार्फतीने तात्काळ दोन पंचांना घटनास्थळी पाचारण केले. दोन पंच घटनास्थळी आल्यानंतर त्यांचेसमक्ष नमूद इसमाच्या ताब्यामधून ११५ ग्रॅम 'एम.डी.' (मेफेड्रॉन) हा अंमली पदार्थ (किंमत रूपये १७,२५,०००/—), मिळून आला. सदरचा अंमली पदार्थ जागीच सिलबंद करून त्यास मुद्येमाल प्रदर्शित क्रमांक 'अ', देवून तो पंचनामा अंतर्गत हस्तगत करण्यात आला.त्यानंतर नमुद इसमाविरूध्द गुन्हा नोंद करून नमुद इसमास अटक करण्यात आली आहे.

नमुद आरोपीत इसमाकडून जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाची मा. महानगर दंडाधिकारी, ६४ वे न्यायालय, एस्प्लनेड, मुंबई यांचे न्यायालयात इन्व्हेंटरी प्रकीया पुर्ण करून इन्व्हेंटरी दरम्यान काढण्यात आलेला सी.ए. नमुना रासायनिक विश्लेषन व अहवाला करीता मा. संचालक न्याय सहाय्यक प्रयोगशाळा कलीना, मुंबई यांचे प्रयोगशाळेत पाठवून सदर बाबतचा अहवाल प्राप्त करून, तपास पुर्ण करून नमुद अटक आरोपीविरूध्द मा. विशेष सत्र न्यायधिश,

अंमली पदार्थ विरोधी कक्ष, वरळी युनिट, गु.शा.,गु.अ.वि., मुंबई गु.र.क्र १३६/२०२२ कलम ८ (क) सह २२(क) एन. डी. पी. एस. ॲक्ट – १९८५

| अ. क्र | पदनाम | संपुर्ण नाव | शेरा |
|---|---|---|---|
| १ | पोलीस निरीक्षक | श्री.संतोष शिवराम साळुंखे | प्रशस्तीपत्रक |
| २ | पोलीस उप निरीक्षक | श्री.सुरेश बाळकृष्ण साळुंखे | प्रशस्तीपत्रक |
| ३ | स.फौ.क्र.३१०७७ | संदिप बाजीराव काकडे | प्रशस्तीपत्रक |